| GRAND TEST | इयत्ता : १० वी<br>मराठी (CODE-A) | गुण : ८०<br>वेळ : ३ तास |
|---|---|---|

**सूचना :** १) कृतिपत्रिकेतील सूचनेनुसार आवश्यक तेथे आकृतिबंधाचा वापर करावा.
२) आकृत्यांसाठी पेनाचा वापर करावा.
३) सुवाच्च्य आणि स्पष्ट अक्षर अपेक्षित आहे.
४) लेखन विभाग आणि व्याकरण विभागामध्ये विचारलेल्या प्रश्नांसाठी आकृत्याची आवश्यकता नाहीं.

## विभाग १ - गद्य **२०**

**प्र. १ पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **८**

**क) कृती १ : कृष्णाबाईंना याची गंमत व कौतुक वाटे -** **(२)**

| | |
|---|---|
| i | |
| ii | |

चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झाला. हा काव्यसंग्रह नंतर अनेक विद्यापीठातून अभ्यासक्रमालाही लावला होता. त्यासाठी अनेक कॉलेजामधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी बोलावलं जायचं. मला गंमत वाटायची आणि कौतुकही, कारण मास्तर स्वतः कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. अनेकांची पत्रही यायची मास्तरांना. मास्तर खूप आनंदात असायचे. एखादी नवी कविता लिहून झाली की मग विचारायलाच नको. त्यांच्या अनेक कवितांची पहिली श्रोता मीच असायची. कविता लिहून झाली की ते मला वाचून दाखवयाचे. त्यांनी कविता लिहिल्याचा मलाही आनंद होत असे, पण तो व्यक्त कसा करायचा हे मला समजत नसे किंवा कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे. अनेकदा मी माझ्या संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द माझ्या कानांवर पडायचे, पण त्यातला भाव मात्र मला समजायलाचाच नाही. एवढं मात्र नक्की की ते लिहीत असताना घरातल्या कोणत्याच कटकटी मी त्यांच्यापर्यंत न्यायची नाही. आणि माझं मन म्हणायचं, 'कृष्णाबाई, तुला काही कळतंय का त्यातलं ? एक तर तू अडाणी बाई, तुला काय समजणार आहे त्यातलं ? बावळटासारखं काहीतरी बोलून उगाच हसं करुन घेशील' आणि खरचं, मला ते उगाचच 'छान आहे', 'चांगली आहे' असं वरवरचं बोलायलाही आवडायचं नाही आणि पटायचंही नाही. त्यापेक्षा गप्प राहिलेलं बरं, असं म्हणून मी माझं काम शांतपणे करत बसायची. मास्तरही माझ्या उत्तराची अपेक्षा करीत नसत.

**कृती २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i) मास्तरांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे नाव काय ?
ii) मास्तरांचा काव्यसंग्रह कोठे अभ्यासक्रमात लावला ?

**कृती ३ :** i) **लिंग बदला.** **(१)**

| | |
|---|---|
| बाई - ———— | चांगला - ————— |

ii) अनेक वचन लिहा. **(१)**

| | |
|---|---|
| गंमत - ———— | प्रतिक्रिया -——— |

कृती ४ : कवी, कविता व कवितासंग्रह याविषयी तुमचे मत मांडा. **(२)**

**प्र. १ ख) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.** **(८)**

**कृती १ : एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i) पतिपत्नीला कोणता ध्यास लागला होता ?

ii) कशामुळे आनंदवन निर्माण झाले ?

बाबांच घराणं मालगुजाराचं. जे मागू ते देणार. किंबहुना न मागताही देणारं ते घर होतं. आईवडील, भावंड, नातेवाईक, मित्र अशांच्या उबेत बाबा सुखात होते.

डॉक्टर व्हायचं ध्येय मनाशी बाळगलं तरी वडीलाचं ऐकण्याचे ते दिवस! त्यामुळे वडिलांच्या मनाप्रमाणे ते वकील झाले. वकिली करु लागले. पण तत्वाशी तडजोड किती काळ करता येईल ? वकिलीत मन रमेना.

वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडून आले. त्या कार्याबरोबरच त्यांचे इतर कार्यही चाले. मैल्याच्या पाय्या डोक्यावरुन वाहणे, संडास साफ करणे अशी कामेही ते करत. समाजातील एका विशिष्ट गटानेच ती कामे का करायची ? मला सुद्धा ती कामे करण्याचा हक्क आहे म्हणून ते ही कामे देखील करत.

एक दिवस रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला, नासलेल्या शरीराचा तुळशीराम त्यांना दिसला आणि लक्ष्मींच नातं त्यानं सहज तोडलं आणि मुद्दामहून एक नातेवाईक जोडला. दरिद्रीनारायण! या नातेवाईकांशी सामना करायला एक जिवाभावाचं माणूसही त्यांना गवसलं - इंदू धुले.सात पिढ्याचं महामहोपाध्यायांच नातं असणारी मुग्ध, अबोल, बुद्धीमान, करारी, प्रेमळ इंदू बाबांची 'साधना' झाली.

कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही. अशी वचन जिनं आत्मसात केली होती. तिच्यासाठी 'पतिव्रता' हा शब्द सर्वार्थांन योग्य वाटावा असा. पतीनं घेतलेल्या, स्वीकारलेल्या व्रत्तासाठी समर्पण करणारी 'साधना आमटे' सर्वांची ताई झाली. सौ. साधनाताई आमटे. वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यु झालेला पाहून दु:ख झालेल्या बाबांनी ताईजवळ आपल्या अस्वस्थतेची, दु:खाची कबुली दिली आणि या दु:खाची तीव्रता कमी कशी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रुपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला, या ध्यासाचा श्वास झाला आणि अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे निर्माण झाल आनंदवन!

**कृती २ : सत्य की असत्य ते लिहा.** **(२)**

i) नगरपालिकेत बाबा अध्यक्ष होते. ☐

ii) बाबांचे घराणे मालगुजाराचे होते. ☐

iii) बाबांना वकील व्हायचे होते. ☐

iv) वडिलांना बाबा वकील व्हावेसे वाटत होते. ☐

**कृती ३ : १) अनेकवचन लिहा.** **(१)**

i) कपडा ☐ ii) गाडी ☐

२) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

i) मित्र × ii) सुख ×

**कृती ४ :** 'कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही' या सुवचनावर तुमचे मत लिहा. **(२)**

**प्र. १ ग) पुढील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा. (त्यांचे उत्तर प्रत्येकी एका वाक्यात असावे)** **(४)**

ईश्वर आणि माणूस यांचे नाते माय-लेकरांसारखे असते. आई कधी आपल्या मुलाला उपाशी ठेवून स्वतः तूप रोटी खाईल का? देवाला देखील आपला भक्त उपाशी असताना तूप कसे गोड लागेल? खरे तर ईश्वराला तूप, नैवेद्य, पूजा अर्चा या अवडंबराची अजिबात गरज नसते. तो फक्त भावाचा भुकेला असतो. असे असताना भारतासारख्या गरीब देशात, जिथे लाखो लोकांना पोटाला अन्न मिळत नाही, तिथे देवा-धर्मावर वारेमाप उधळपट्टी कितपत योग्य आहे?

## विभाग २ - पद्य **१६**

**प्र. २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

**१ : संतांना पाहून सेना महाराजांना असे वाटले.** **(१)**

| | |
|---|---|
| १) | २) |

वरील अभंगात कोणत्या सणांचा उल्लेख आला आहे? **(१)**

| | |
|---|---|
| १) | २) |

**पद्य :** आजि सोनियाचा दिवस। दृष्टीं देखिलें संतांस।।१।।
जिवा सुख झालें। माझे माहेर भेटले।।२।।
अवघा निरसला शीण। देखता संतचरण।।३।।
आजि दिवाळी दसरा। सेना म्हणे आले घरा।।४।।

**अ) २ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(२)**

१) संत सेना महारांजाचा थकवा कशामुळे गेला ?

२) सेना महाराजांच्या समकालीन संतांची नावे लिहा.

**अ) ३ : खालील पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **(२)**

अवघा निरसला शीण। देखता संतचरण।।३।।

आजि दिवाळी दसरा। सेना म्हणे आले घरा।।४।।

**अ) ४ : पर्याय ओळखून रिकाम्या जागी लिहा.** **(१)**

१) आजि सोनियाचा दिवस हा अभंग ————— यामधून घेतला आहे.
(श्रीमद्‌भागवत, श्री संकलसंतगाथा, श्री अभंगगाथा)

२) खालील पद्यपंक्ती पूर्ण करा. **(१)**
आजि सोनियाचा दिवस —————- संतांस.

**प्र. २ ब) पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(८)**

**कृती १: शब्दजाल पूर्ण करा.**

i) कवीच्या मते पुढील गोष्टी जमीनदोस्त व्हाव्यात. **(१)**

| | |
|---|---|
| १) | २) |

ii) आदर्श घरे आणि शहरे अशी हवीत - **(२)**

१) २)

३) ४)

iii) समतेच्या तुफानात विषमतेचे दगडगोटे **(१)**

१) उडून जावेत २) वितळावेत

**पद्यांश :**

असा प्रलय व्हावा जमीनदोस्त व्हावीत
घरे आणि शहरे पुन्हा निर्माण व्हावीत
एकाच आकाराची एकाच विचाराची
आणि एकाच उंचीची भेदाभेदरहित
असा प्रलय व्हावा साऱ्या नद्यांचे प्रवाह बदलावेत
खुरटी झुडपे आकाशाला भिडावीत
सारा निसर्गच बदलावा माणसाला बदलण्यासाठी
आणि माणसाला किंमत यावी माणूस म्हणून

**कृती २ : पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

१) सारा निसर्ग ——————
—————— माणूस म्हणून. (२)
या ओळींमधील सौंदर्य स्पष्ट करा.

**२) कृती करा.** (२)

असा प्रलय व्हावा
समतेचं तुफान सुटावं
विषमतेचे दगडगोटे
उडून जावेत अस्मानात

| | |
|---|---|
| सारा निसर्ग यासाठी बदलावा | १) |
| | |
| | २) |

## विभाग ३ - स्थूलवाचन

४

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती करा.**

१) पाण्याचे महत्त्व अम्माने पत्रातून कसे लिहिले आहे ?
२) नागनाथ अण्णा नायकवाडी यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्य चळवळीत भाग कसा घेतला ?
३) कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
४) स्वतः झाड झाल्यावर चिनार व जुई यांना कोणता अनुभव आला ?

## विभाग ४ - व्याकरण

१०

**प्र. ४ अ) खालील रिकाम्या जागा भरुन कोष्टक पूर्ण करा.** (२)

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १) | पंचवटी | ———————- | ———————- |
| २) | पापपुण्य | ———————- | ———————- |

**ब) सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.** (२)

१) तुमचे घर फारच छान आहे. (उद्‍गारार्थी करा)
२) तू विजयी होऊन यावेस. (प्रश्नार्थी वाक्य करा)

**क) शब्द संपत्ती - गटात न बसणारा शब्द लिहा.** **(१)**

१) मोर, बगळा, कबूतर, मांजर, घार

२) पेन, पेन्सिल, चाकू, वही, पुस्तक

**ड) विरामचिन्हांचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

खरा घनचक्कर तर मीच आहे.

**इ) खालील वाक्य लेखन नियमानुसार लिहा.** **(१)**

आमी साळेत वेळेवर गेलो.

**फ) वाक्यप्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.** **(२)**

| | |
|---|---|
| १) स्तंभित होणे | वाईट वाटणे |
| २) विपर्यास करणे | झोप लागणे |
| ३) डोळा लागणे | आश्चर्यचकित होणे |
| ४) मन दुखावणे | चुकीचा अर्थ घेणे |

**ग) पुढील शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**

**व्रत**

## विभाग ५ - उपयोजित लेखन **३०**

**प्र. ५ अ) पुढीलपैकी कोणत्याही एका पत्राचा नमुना तयार करा.** **(५)**

i) इयत्ता दहावीचा विद्यार्थी या नात्याने मा. पोलिस इन्स्पेक्टर, भांडूप पोलिस स्टेशन, भांडूप, मुंबई - ४०००४२ यांना रस्त्यावरील आवाजामुळे अभ्यासामध्ये येणाऱ्या व्यत्ययाबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.

**अथवा**

ii) अमर स्पोर्टस डेपो, आप्पा बळवंत चौक, पुणे - ३० यांच्या व्यवस्थापकांना वर्धापन दिनानिमित्त विद्यालयास ५०% सवलतीच्या दरात पुस्तके द्यावीत असे पत्र विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने लिहा.

**ब)** खालील अपूर्ण कथा पूर्ण करुन लिहा. **(५)**

एक घनगाट जंगल होते. त्या जंगलात अनेक प्राणी गुण्यागोविंदाने एकत्रित राहत होते. परंतु त्या जंगलाचा राजा सिंह दिसेल त्या प्राण्याला ठार मारुन आपली भूक भागवत असे. त्यामुळे जंगलातील सर्व प्राणी त्याला अतिशय घाबरत असत.

एकदा सर्व प्राण्यांनी सभा भरवली व ठरवले की, ——————

**क)** खालील उतारा वाचून पाच असे प्रश्न तयार करा की ज्यांची उत्तरे एका वाक्यात असतील. **(५)**


निसर्ग महान जादूगार आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लीला अगाध आहेत. निसर्ग हा प्रसन्न, रमणीय सौदर्यशील आहे. त्याच्या संगतीत रमताना कळत-नकळत आपण खूप गोष्टी शिकतो. आपण अंर्तमुख होतो, विचार करु लागतो. दुथडी भरुन वाहणारी नदी, उडी घेणारे जलप्रपात वाहता झरा हे सारे आपल्याला जणू 9पुढे जा, पुढे जात राहा" असा संदेश देतात. आसमंत गंधित करणारे फूल, मन रिझवणारा वारा, शीतल छाया देणारा व रसाळ फळे देणारा वृक्ष, आपल्या कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला 9देते व्हा, देण्यातला आनंद लुटा" हा कानमंत्र देत राहतात.

**प्र. ६ अ) पुढील तीन कृतीपैकी कोणत्याही दोन कृती अनिवार्य आहेत.**

१) खाली दिलेल्या बातमीच्या मथळ्यावरुन आकर्षक जाहिरात तयार करा. **(५)**

आमच्याकडे सर्व प्रकारची व सर्व चवींची आईस्क्रीम मिळतील.

२) तुमच्या विभागात संपन्न झालेल्या रक्तदान शिबिराचा वृत्तांत लिहा. **(५)**




३) पुढील उताऱ्याच्या १/३ सारांश स्वतःच्या शब्दांत लिहा. **(५)**

पुस्तकासारखा मित्र नाही असे म्हणतात. इतर मित्र आहेत, पण ते कधी रागावतात, कधी चिडतात, तर कधी चेष्टा करतात, कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत. कधी ते आपले अंतरंग खुले करत नाहीत. ते आपणापासून लपवून ठेवतात. परंतु पुस्तकाचे तसे नाही. त्याला जवळ करण्याचा अवकाश की, ते आपले अंतरंग खुले करतात कधी फसवत नाही. नेहमी अगदी आपल्या सेवेस तत्पर असते.

पुस्तकांचे अनेक प्रकार असतत. काही पुस्तके अल्पायुषी तर काही दीर्घायुषी असतात. त्यांचे आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असते. विचार जितके स्थायी तितके पुस्तक स्थायी. वर्तमानपत्राचे आयुष्य एक दिवसाचे, सकाळी उत्साहाने व आतुरतेने वाचतो. पण त्याचे पारायण करतो असे कोणी म्हणेल तर ते योग्य ठरणार नाही. मासिकाचे आयुष्य एक महिना : परंतु भगवद्गीता, बायबल ही पुस्तके सदा सर्वकाळ बहुमोल असून ती तृप्त मनाला समाधान देतात.

**ब) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर ८० ते १०० शब्दात निबंध लिहा.** **(५)**

१) वृक्षारोपण  २) जर मी डॉक्टर झालो तर...  ३) पूर ग्रस्ताची आत्मकथा

◆◆◆◆